# ‘नॅब’ कलाकारांचा ‘डोळस’ कलाविष्कार

## दीक्षांत समारंभ ग्रंथ महोत्सवास उत्साहात प्रारंभ

**कोल्हापूर: प्रतिनिधी**

ओंकार स्वरूपा... आई भवानी तुझ्या कृपेने... जिवा-शिवाची बैलजोडी... एकविरा आई डोंगरावरी... अशी एकापेक्षा एक बहारदार मराठी, हिंदी गीते सादर करून कोल्हापूर ‘नॅब’च्या अंध कलाकारांनी कलागुणांची उधळण करीत रंग भरला. निमित्त होत दीक्षांत समारंभानिमित्त आयोजित सांस्कृतिक कार्यक्रमाचे.

राष्ट्रीय अंध (नॅब) संघटनेतर्फे अंध विद्यार्थी वाद्यवृंदाचा ‘ऑर्केस्ट्रा आयडियल स्टार्स’ हा सांस्कृतिक कार्यक्रम शुक्रवारी (दि. २६) लोककला केंद्रात झाला. यावेळी ‘नॅब’चे संचालक डॉ. एम. बी. डोंगरे, डॉ. एन. बी. शेख, विजय रेळेकर, केरबा हांडे, शिवानंद पिसे, राजेश व्होरा, वाद्यवृंद संयोजक दीपक कारंजकर उपस्थित होते. ग्रंथपाल डॉ. नमिता खोत यांनी स्वागत केले.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ लोककला केंद्रात आयोजित सांस्कृतिक कार्यक्रमात कलाविष्कार सादर करताना कोल्हापूर ‘नॅब’चे विद्यार्थी वाद्यवृंद.**

### निर्भया अभियानास प्रारंभ...

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२५व्या जयंतीचे औचित्य साधून विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजनेंतर्गत १२५ विद्यार्थिनींचा सहभाग असणारे विशेष निर्भया अभियान आजपासून सुरू झाले. कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या उपस्थितीत अभियानास प्रारंभ झाला. अभियानाअंतर्गत विद्यार्थिनींना स्वसंरक्षणाचे धडे देण्यात येणार आहेत. याप्रसंगी विद्यार्थिनींनी काही प्रात्यक्षिकेही सादर केली.

बॅ. बाळासाहेब खर्डेकर ग्रंथालयाच्या वतीने आयोजित ‘ग्रंथ महोत्सव - २०१६’चे उद्घाटन आज सकाळी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते झाले. यंदा ५० हून अधिक प्रकाशक, विक्रेते महोत्सवात सहभागी झाले आहेत. स्पर्धा परीक्षाविषयक मार्गदर्शक पुस्तकांबरोबरच विविध सामाजिक, साहित्यिक, वैचारिक पुस्तकांचेही स्टॉल उपलब्ध आहेत. काही प्रकाशकांनी २० ते ३० टक्क्यांपर्यंत सवलतीच्या दरात पुस्तके उपलब्ध केली आहेत. ग्रंथ महोत्सव २८ फेब्रुवारीपर्यंत सकाळी ९ ते रात्री ९ या कालावधीत सुरू राहणार आहे.

दरम्यान, बॅ. बाळासाहेब खर्डेकर ग्रंथालयाच्या नूतन विस्तारित इमारतीसमोर आज सौ. अनिता शिंदे यांच्या हस्ते चहा-कॉफी स्टॉलचे उद्घाटन झाले. याठिकाणी कॉफी व्हेंडिग मशीनच्या माध्यमातून सेवा देण्यात येणार आहे. अभ्यासिकेतील विद्यार्थ्यांसाठी सकाळी ७ ते रात्री १०.३० वाजेपर्यंत ही सेवा उपलब्ध असणार आहे. यावेळी प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, बीसीयूडी संचालक डॉ. डी. आर. मोरे, परीक्षा नियंत्रक महेश काकडे, ग्रंथपाल डॉ. नमिता खोत, विद्यार्थी कल्याण मंडळाचे संचालक डॉ. डी. के. गायकवाड, उपग्रंथपाल डॉ. डी. बी. सुतार, सहाय्यक ग्रंथपाल डॉ. पी.बी. बिलावर, शिक्षक, प्रशासकीय सेवक उपस्थित होते.

**‘कॅरी बॅग’ला पर्याय ‘सारी बॅग’चा..!**

ग्रंथ महोत्सवामध्ये शाहू महाविद्यालयाच्या एनएसएस युनिटमार्फत लक्षवेधी स्टॉल लावण्यात आला आहे. यात विद्यार्थिनींनी जुन्या साड्यांपासून बनविलेल्या सारी बॅग विक्रीसाठी ठेवल्या आहेत. प्लास्टिक कॅरी बॅगला सारी बॅग हा उत्तम व पर्यावरणपूरक पर्याय असून प्रदर्शनात सहभागी प्रकाशकांनी, ग्राहकांनी पुस्तकांसाठी कॅरी बॅगऐवजी येथील सारी बॅग आवर्जून वापराव्यात, असे आवाहन कुलगुरू डॉ. शिंदे यांनी केले.